जनसंपर्क कक्ष
0 6 FEB 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निरंतर शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

## एस. एस. महाजन : शिवाजी विद्यापीठात निरंतर अभ्यासक्रम सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : निरंतर शिक्षण अभ्यासक्रम औपचारिक व अनौपचारिक शिक्षणातील दुरावा कमी करण्यास मदत करतो. औपचारिक शिक्षणाचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य व दृष्टिकोन पुरवितात, असे मत शिवाजी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने आयोजित विविध निरंतर अभ्यासक्रमाचा उद्घाटन समारंभ विभागाच्या सभागृहात पार पडला. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून महाजन बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शरद बनसोडे आणि विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.

विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांनी आपल्या भाषणातून विभागाच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली. सहायक प्राध्यापिका डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत केले. यावेळी विविध अभ्यासक्रमाचे मानद तज्ज्ञ व्यक्ती टी. आर. गुरव, वसंत सिंघन, रवींद्र खैरे, अभिजित जाधव, गीता कुलकर्णी, वीणा मालडीकर, प्रीती चव्हाण यांची भाषणे झाली. श्वेता आठवले यांनी सूत्रसंचालन केले.

0 6 FEB 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना आज पुन्हा प्रारंभ

## सेवक संघ बहिष्कारावर ठाम : बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांवर होणार परिणाम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांना आज, सोमवारपासून नियोजित वेळापत्रकानुसार पुन्हा प्रारंभ होत आहेत. महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने बहिष्कार घातल्यामुळे गुरुवारपासून या परीक्षा स्थगित केल्या होत्या. समिती आंदोलनावर ठाम राहिल्यामुळे विद्यापीठाने 'पर्यायी व्यवस्था करून या परीक्षा पार पाडण्याची तयारी केली आहे.

### बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांवर होणार परिणाम

बारावीच्या लेखी परीक्षांना २१ फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे. मात्र, बहिष्कार आंदोलनाचा बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांवर नक्की परिणाम होणार आहे. विद्यापीठ विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप संघटनेने केला आहे.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यातील हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध केंद्रावरील परीक्षा बहिष्कार आंदोलनामुळे ठप्प झाल्या होत्या. मात्र या परीक्षा वेळेत पार पाडण्यासाठी संबंधित महाविद्यालये, त्यांचे प्राचार्य, अधिविभागप्रमुख, संचालक या केंद्रप्रमुखांवर रविवारी झालेल्या ऑनलाइन बैठकीत जबाबदारी निश्चित केल्या आहेत. त्यानुसार १८ केंद्रांवरील ३२ परीक्षांसाठी बसणाऱ्या ११५३२ विद्यार्थ्यांची परीक्षा सोमवारी दोन सत्रात सुरळीतपणे पार पाडतील असा विश्वास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी व्यक्त केली आहे. प्रश्नपत्रिका प्रश्नपेढीपर्यंत पोहोचल्या आहेत आणि परीक्षांसंदर्भातील इतर तयारी पूर्ण झाल्याचेही जाधव यांनी सांगितले.

दरम्यान समिती आंदोलनावर ठाम असल्याचे सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.

लोकमत

# विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास राज्यपाल येणार

## १६ फेब्रुवारीला होणार दीक्षांत समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ गुरुवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदक, तसेच कुलपती सुवर्णपदक देण्यात येणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या दीक्षांत समारंभासाठी अध्यक्ष म्हणून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि माजी खा. विनय सहस्त्रबुद्धे उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या नवीन सदस्यांच्या उपस्थितीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीत दीक्षांत समारंभाची तारीख निश्चित करण्यात आली. समारंभाचे अध्यक्ष राज्यपाल भगतसिंह कोश्यारी असतील तर माजी खासदार आणि इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना या समारंभासाठी प्रमुखपाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. सहस्त्रबुद्धे यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची सौम्य संपदा याविषयी मांडणी केली आहे. समारंभात राज्यपाल, दोन्ही प्रमुख पाहुणे स्नातकांना मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीला प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

### १६,५०० प्रमाणपत्रांचे होणार वितरण

शिवाजी विद्यापीठातील शाहू सभागृहात प्रथेप्रमाणे प्रमाणपत्र वाचन व अन्य कार्यक्रम होणार आहेत. दीक्षांत समारंभाचे अध्यक्ष कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मोजक्याच स्नातकांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल. या समारंभात सुमारे १६,५०० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार केली आहे.

महासत्ता

# निरंतर शिक्षणातून होतो विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास : डॉ.एस.एस. महाजन

कोल्हापूर, ता.४ (प्रतिनिधी)-

..................

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने आयोजित विविध निरंतर अभ्यासक्रमाचा उद्‌घाटन समारंभ विभागाच्या सभागृहात शनिवारी पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यापीठ अधिष्ठाता डॉ.एस. एस. महाजन, प्रमुख पाहुणे डॉ. शरद बनसोडे व विभाग प्रमुख डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. महाजन म्हणाले, निरंतर शिक्षण अभ्यासक्रम औपचारिक व अनौपचारिक शिक्षणातील दुरावा कमी करण्यास मदत करतो. २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आजीवन अध्ययन विस्तार विभागामध्ये औपचारिक शिक्षणाचे अनेक अभ्यासक्रम राबवता येतात. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य व दृष्टिकोन पुरवतात. त्यामुळे सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विभाग प्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांनी आपल्या भाषणातून विभागाच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली. कार्यक्रमाचे स्वागत व पाहुण्यांची ओळख सहा.प्राध्यापिका डॉक्टर सुमन बुवा यांनी करून दिली. दरम्यान विविध अभ्यासक्रमाचे मानद तज्ञ व्यक्ती टी आर गुरव, वसंत सिंघन, रवींद्र खैरे, अभिजीत जाधव, गीता कुलकर्णी, विणा मालडीकर, प्रीती चव्हाण यांची भाषणे झाली. आभार व सूत्रसंचालन श्वेता आठवले यांनी केले. यावेळी इव्हेंट मॅनेजमेंट, योग, मोडी लिपी, सूत्रसंचालन यासह विविध विषयाचे विद्यार्थी, शिक्षकेतर स्टाफ, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा आजपासून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना सोमवार (दि. ६) पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार प्रारंभ होणार आहे.



महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने २ फेब्रुवारीपासून बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. परीक्षा कामकाजावर बहिष्कार घातला असून अद्याप संप मिटलेला नाही. दरम्यान, विद्यापीठाने परिपत्रक काढून ६ फेब्रुवारीपासून परीक्षा घेण्याबाबत अधिविभाग, महाविद्यालयांना निर्देश दिले आहेत. परीक्षेसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. बीए, बी.कॉम., बीएस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., बी.टेक, लॉ आदी विविध ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सोमवारी होणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ११ हजार ५३२ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. त्यानुसार परीक्षांची तयारी पूर्ण झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

## ...अन्यथा २० फेब्रुवारीपासून बेमुदत कामबंद

विद्यापीठीय व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत आंदोलन सुरूच राहणार आहे. पहिल्या टप्प्यात १६ फेब्रुवारीपर्यंत परीक्षा कामकाजावर बहिष्कार असणार आहे. यात नियमित कर्मचारी सहभागी होणार नाहीत. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत विचार न केल्यास २० फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलन केले जाईल, असे राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीचे मुख्य संघटक मिलिंद भोसले, आनंद खामकर यांनी दिली.

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरूनच 'स्तुति' कार्यक्रम : कुलगुरू गुडासी

कोल्हापूर : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरुनच 'स्तुति' कार्यक्रम आहे, असे प्रतिपादन कर्नाटक विद्यापीठ, धारवाडचे कुलगुरू प्रा. के. बी. गुडासी यांनी केले. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठ 'स्तुति' प्रशिक्षण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. प्रथम सत्रात शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रा. जी. एस. राशिनकर यांनी मास स्पेक्टरोस्कोपी उपकरणावर मार्गदर्शन केले. प्रा. पल्लवी भांगे यांनी बी. ई. टी. या उपकरणाची माहिती दिली. समारोप कार्यक्रम प्रसंगी स्तुतीचे समन्वयक प्रा. डॉ. आर.जी. सोनकवडे यांनी २२ स्तुति कार्यक्रमांचा आढावा घेतला, सत्यशीला घोंगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात निरंतर शिक्षण अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने विविध निरंतर अभ्यासक्रमांचा उद्‌घाटन समारंभ नुकताच झाला. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. शरद बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांनी शैक्षणिक वाटचालीबाबत माहिती दिली. टी. आर. गुरव, वसंत सिंघन, रवींद्र खैरे यांची मनोगते झाली. स्वागत डॉ. सुमन बुवा यांनी केले. श्वेता आठवले यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# मराठी विभागात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**कोल्हापूर :** शिक्षक हे परिपूर्ण माणूस घडवण्याचे कार्य करतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातील शैक्षणिक वर्ष १९९६-९७, ९७-९८ या वर्षातील माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमासाठी प्राचार्य अशोक बाबर, प्रा. डॉ. गिरीश मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, सोनाली नवांगुळ, डॉ. हिमांशू स्मार्त, चंद्रशेखर गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांमार्फत डॉ. हिमांशू स्मार्त, सोनाली नवांगुळ यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
0 6 FEB 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून 'स्तुती'

## कुलगुरू प्रा. के. बी. गुडासी; शिवाजी विद्यापीठातील प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप



**कोल्हापूर : स्तुती प्रशिक्षण समारोपाप्रसंगी कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गुडासी यांचा सत्कार प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी केले.**

▶ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : 'नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून स्तुती प्रशिक्षण आहे. या प्रशिक्षणामुळे अनेक विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि उद्योगपती यांना त्यांच्या नवनवीन कल्पना आणि संशोधन उच्च स्तरावर देण्यास त्याचप्रकारे अत्याधुनिक उपकरणांशी परिचित होण्यास मदत होत आहे', असे प्रतिपादन धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. के. बी. गुडासी यांनी आज येथे केले.

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे शिवाजी विद्यापीठातील या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या सैफ सेंटरचे आणि स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी अध्यापनासाठी कोणत्याही सीमा नसल्याचे सांगितले. त्यांनी आतापर्यंत झालेल्या एकूण २२ स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमांचा लेखाजोखा मांडला. रसायनशास्त्र विभागाचे डॉ. जी. एस. राशिनकर यांनी मास स्पेक्ट्रोस्कोपी या उपकरणाची आणि प्रा. पल्लवी भांगे यांनी बीईटी उपकरणाची माहिती दिली. सत्यशीला घोंगडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले. दरम्यान, या प्रशिक्षण कार्यक्रमात कोल्हापूर, सातारा, हरियाणा, मुंबई, गुजरात, पुणे, औरंगाबाद, सोलापूर, कराड, वडोदरा, गोवा येथील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले.

06 FEB 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून पुन्हा सुरू; कर्मचाऱ्यांचे आंदोलन कायम

# परीक्षांची जबाबदारी प्राचार्य, अधिविभाग प्रमुखांवर

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बहिष्कार आंदोलनामुळे शिवाजी विद्यापीठाने गेल्या चार दिवसांसाठी परीक्षा स्थगित केल्या होत्या. मात्र, विद्यार्थीहित लक्षात घेऊन आणि शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठाने या परीक्षा उद्या, सोमवार (ता. ६) पासून पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षा वेळेत घेण्याची जबाबदारी विद्यापीठाने अधिविभागप्रमुख आणि प्राचार्यांवर सोपविली आहे. त्याच्या पहिल्यादिवशी विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या ३२ परीक्षांसाठी ११,५२३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांचे आंदोलन कायम राहणार आहे.

शासन आदेशानुसार कार्यवाही करत विद्यापीठाने हिवाळी सत्रातील स्थगित केलेल्या परीक्षा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय शनिवारी जाहीर केला.



बी. कॉम., बी. ए., बी. एस्सी., बी. टेक., आर्किटेक्चर., बी. ए. बी. एड., बी. कॉम., बँक मॅनेजमेंट अशा विविध ३२ विषयांच्या परीक्षा सोमवारी सकाळी साडेदहा ते दुपारी दीड आणि दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच या दोन सत्रांमध्ये होतील. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा परीक्षाविषयक कामकाजावर बहिष्कार कायम आहे. त्यामुळे या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी प्राध्यापक, मानसेवी, रोजंदारी कर्मचारी आणि विनाअनुदानित विभागातील शिक्षक, कर्मचाऱ्यांची मदत घेण्याचे नियोजन केले आहे. त्यांना परीक्षा कामकाजाची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून रविवारी देण्यात आली आहे. परीक्षा सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांना मात्र दिलासा मिळणार आहे.

> ज्या विद्यार्थ्यांच्या सोमवारी परीक्षा होणार आहेत. त्यांना त्याबाबतचे एसएमएस शनिवारी पाठविले आहेत. अधिविभागप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापकांना सूचना दिल्या आहेत.
>
> **- डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा मंडळ

> शिवाजी विद्यापीठाच्या सूचनेनुसार पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येतील. त्यासाठी शिक्षक, विनाअनुदानित विभागातील कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाणार आहे.
>
> **- डॉ. व्ही. एम. पाटील,** सचिव, प्राचार्य संघटना

0 6 FEB 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अध्यापनासाठी कोणत्याही सीमा नाहीत


## धारवाड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. गुडासी

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्तुती कार्यक्रमातून संशोधकांना चालना मिळते. विद्यार्थी, संशोधक शिक्षक आणि उद्योगपती यांना त्यांच्या नवनवीन कल्पना आणि संशोधन उच्च स्तरावर नेण्यासाठी अत्याधुनिक उपकरणांशी परिचित होण्यास मदत होते. सध्या सरकारच्या स्टार्टअप योजनेत कोणत्याही वयाचा व्यक्ती सहभागी होऊ शकतो. त्यामुळे अध्यापनासाठी कोणत्याही सीमा नाहीत, असे प्रतिपादन धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. गुडासी यांनी केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठातील स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील अत्याधुनिक उपकरणे आणि त्याची प्रात्यक्षिके समजून घेऊन त्याचा वापर संशोधकांकडून शोधकार्यामध्ये व्हावा हे या कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे.

कुलगुरू डॉ. गुडासी म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणावर भर दिला आणि हा स्तुति प्रशिक्षण कार्यक्रम नवीन शैक्षणिक धोरणाशी संलग्न आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम देशभर राबविले जात आहेत. स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे अनेक प्रकारच्या नवनवीन उपकरणांची माहिती मिळाली, असे मत डॉ. गुडासी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे डॉ. जी. एस. राशिनकर यांनी 'मास स्पेक्टरोस्कोपी' या उपकरणाविषयी मार्गदर्शन केले. प्रा. पल्लवी भांगे यांनी 'बी. इ. टी.' या उपकरणावर मार्गदर्शन केले. स्तुति कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सोनकवडे यांनी आतापर्यंत देशभरात झालेल्या २२ स्तुति कार्यक्रमांचा लेखाजोखा मांडला. या कार्यक्रमासाठी सातारा, हरियाणा, मुंबई, गुजरात, पुणे, औरंगाबाद, सोलापूर, कराड, वडोदरा, गोवा आदी ठिकाणाहून २१३ पेक्षा अधिक विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभागी होण्यासाठी इच्छा व्यक्त केली होती. तसेच शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सहकार्य केल्याबद्दल अभिनंदन केले.



तरुण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून पूर्ववत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ च्या हिवाळी पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा आज ६ फेब्रुवारीपासून पूर्ववत होणार आहेत. या परीक्षा पुर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील. या परीक्षेच्या कामावर कर्मचाऱ्यांचा बहिष्कार असल्याने प्राध्यापक, इतर कर्मचाऱ्यांना रविवारी दिवसभर परीक्षेसंदर्भातील प्रशिक्षण देण्याचे काम सुरू होते. तसेच २०१६ च्या विद्यापीठ कायद्यानुसार केंद्रप्रमुख, अधिविभागप्रमुख, संचालक, प्राचार्य यांनी परीक्षा पूर्ण कराव्यात, अशा सूचना महाविद्यालय व अधिविभागांना देण्यात आल्या आहेत.

कोणत्याही अफवांना बळी न पडता विद्यार्थ्यांनी आजपासून नियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा विभाग आणि विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने केले आहे.

Times News Network

# SUK semester exams to resume today, will follow schedule already announced

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur's graduate and postgraduate exams for the winter session will resume on Monday as per the original schedule.

Over 2 lakh students have registered for more than 290 courses at the university for this semester. The exams were cancelled on February 2, due to the boycott call by the Maharashtra State University and College Employees Joint Action Committee. Non-teaching employees in colleges and universities across the state are on strike, with no end in sight.

SUK authorities are uncertain about when the strike will end, but are under pressure from students and parents to hold the exams as per schedule as many students, especially those who received campus placement offers, have been affected. On Saturday, the SUK asked all departments to make alternative manpower arrangements to conduct the exams.

Exam director Ajitsinha Jadhav said: "Departments and colleges have been asked to make sure the exams resume as per the schedule announced earlier. The professors and teaching staff will perform the duties of non-teaching staff to conduct the exams. The fate of the strike depends on the state government. We tried our best to convince staff to halt their strike till the end of the exam, however it has not happened."

The winter session is set to end on March 22. The schedule for the cancelled exams will be declared later, Jadhav said, adding that it will most likely be held in-between the existing exams but promised that there will be no overlaps.

Students and parents have urged the state government to take all steps to stop the agitation and conduct the exams on time keeping in mind the interest and future of students.